CNR No.MHNG100021642015

दाखल तारीख : २१.०७.२०१६
नोंदणी तारीख : २१.०७.२०१६
निकाल तारीख : ०१.०४.२०२६
कालावधी : ०९व. ०८म. ११दि.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उमरेड यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी रा.भा. डोळे यांचे समक्ष)

नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१६ निशाणी क्र. ७१

वादी : १. **कु.अथर्व अमीत जैस्वाल**
वय :४ वर्षे, व्यवसाय : काही नाही

१. **कु.पलक अमीत जैस्वाल**
वय :८ वर्षे, व्यवसाय :शिक्षण
**तर्फे अज्ञान पालनकर्ती आई सौ.शितल अमीत जैस्वाल**
वय : ३४ वर्षे, व्यवसाय :व्यापार
राह. पाचगांव, तह.उमरेड,जि.नागपुर

..विरुध्द..

प्रतिवादी : १. **श्री शिवकुमार रुपलाल जैस्वाल**
वय :६७ वर्षे, व्यवसाय : शेती,

२. **श्री अमीत शिवकुमार जैस्वाल**
वय :४५ वर्षे, व्यवसाय : शेती,

३. **श्री अलोक शिवकुमार जैस्वाल**
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : शेती,
सर्व.राह.पाचगाव तह.उमरेड, जि.नागपुर

४. **सौ.प्रिती संजय जैस्वाल**
वय : ४० वर्षे, व्यवसाय : घरकाम
राह. झेंडा चौक, महाल, नागपुर,जि.नागपुर

५. ~~कृष्णाकुमार रुपलालजी जैस्वाल~~ (वगळण्यात आले)

६. ~~अशोककुमार रुपलालजी जैस्वाल~~ (वगळण्यात आले)

---

**विधिज्ञ : श्री. ए.बी.पोंगडे वादीतर्फे.**
**श्री. एस.के.लिखीते प्रतिवादी क्र. १, ३ व ४ तर्फे**
**श्री. सी.जे.मौदेकर प्रतिवादी क्र. २ तर्फे**

---

**दावा : दावा हा वाटेहिस्से होऊन विभक्त कब्जा मिळण्याबाबत व घोषणा होणेबाबत दाखल केला आहे.**

**न्या य नि र्ण य**
**(पारित दिनांक ०१ एप्रिल, २०२६)**

प्रस्तुतचा दावा हा दावा हा वाटेहिस्से होऊन विभक्त कब्जा मिळण्याबाबत व घोषणा होणेबाबत दाखल केला आहे. वादीचे दाव्यातील वाद कथन पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येईल.

**दावा :**

२. वादी क्र. १ व २ हे प्रतिवादी क्र. २ चे मुले आहे. प्रतिवादी क्र. १ हे प्रतिवादी क्र. २ ते ४ चे वडील आहे. प्रतिवादी क्र. १ ची पत्नी निर्मला ही

हयात नाही. वादी यांनी वंशवृक्ष दाव्यात नमुद केला आहे.

३. मौजा पाचगाव येथे भुमापन क्र. ६१ आराजी १.९७ हे.आर.शेती, मौजा पाचगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील खाली जागा, ६९३(गट क्र. ३०८ मधील प्लॉट क्र. ५४ व ५५ ) ज्यांचे एकूण क्षेत्रफळ ३२९८.९७० चौ.फुट, मौजा पाचगाव येथील नभुमाक्र. ३२३, शीट क्र. ७, आराजी २७७.७८ चौ.मीटर मध्ये घर व खाली जागा आहे.

४. मौजा पाचगाव येथे प्लॉट आहे. ते शिवकुमार व त्यांची पत्नी निर्मला यांच्या नावाने नरेंद्र मधुकर गावंडे पासून खरेदी केला आहे. त्या खरेदी करता लागणारा पैसा वादीच्या आईने आपल्या मेडीकल दुकानातुन दिला होता. तसेच पाचगाव येथील शेती व घरे वडिलोपार्जीत आहे.

५. उपरोक्त नमुद शेती, घर व खाली प्लॉट मध्ये वादी यांचा हिस्सा आहे. त्या मिळकती वडीलोपार्जीत आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे कायदेशिर आवश्कयता नसतांना त्यांची विल्हेवाट लावत आहे. त्यापैकी दोन एकर शेती केशव पांडुरंग रघुते यांना विकली आहे. उर्वरीत शेती विकण्याच्या तयारीत आहे. वादीच्या आईने हरकत घेतली असता, तिला, धमकी दिली. प्रतिवादीने संपुर्ण मिळकत विकली तर, वादीच्या हिश्शावर काहीही मिळणार नाही. वादीला शिक्षणासाठी व पालनपोषणासाठी काहीही मिळणार नाही. वादीने दि.

१६.०७.२०१६ रोजी दैनीक लोकमत मध्ये जाहीर सुचना दिली. परंतु, प्रतिवादी हे ऐकण्याच्या स्थितीत नाही. सबब, त्यांनी दावा दाखल केला.

**<u>प्रतिवादी यांची कैफियत</u>** :

**६.** प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांनी नि.क्र. २५ अन्वये कैफियत दाखल केली. दाव्यातील सर्व कथन त्याने विविक्षीतपणे नाकारले. विशेष कथनमध्ये त्यांनी नमुद केले की, दावा कायदेशिर नाही. वादी यांनी असे नमुद केले आहे की, दोन एकर शेती केशव रघुते यांना विकली परंतु, ते विक्रीपत्र त्यांनी आव्हानीत केले नाही. तसेच केशव रघुते यांना प्रतिवादी म्हणून सामील केले नाही. त्यामुळे दावा कायदेशिर नाही. प्रतिवादी क्र. २ ची हातमिळवणी करुन दावा दाखल केला आहे. मयत निर्मला यांचा मौजा मौदा येथे प्लॉट होता. त्यांनी सदरचा प्लॉट हा त्याच्या भावाची पत्नी ज्योती जैस्वाल हिला दिड लाख रुपयाला दि. १८.०३.२०११ रोजी विकला. त्या मोबदल्यात निर्मला यांनी मिळकत क्र. ६९३ नरेंद्र गावंडे यांच्याकडून विकत घेतली व त्यावर त्यांचे पती शिवकुमार हे एकत्रीत घेणार, म्हणून नमुद केले. विक्रीपत्र दि. ०६.०४.२०११ रोजी तयार करण्यात आले. वादींचा त्यामध्ये कोणताही हिस्सा नाही.

**७.** घर हे डिसेंबर २०१० मध्ये काढण्यात आले, व त्यानंतर त्या ठिकाणी कर्मशिअल ब्लॉक / व्यापरी संकुल हे मे २०११ पर्यंत बांधण्यात आले.

त्यामध्ये वादी व अमीत हे मेडिकलचे दुकान चालवितात. त्याचे नाव अथर्व मेडिकल शॉप आहे. प्रतिवादी क्र. ३ हे मोबाईलचे दुकान चालवितात. त्याचे पलक मोबाईल शॉप आहे. सन २०१३  मध्ये वादीच्या वडीलांनी तीन रुमचे बांधकाम केले. त्यावरुन असे स्पष्ट होते की, वाटणी झाली आहे. वाटणी नंतर मिळकत त्याच्या कब्जात आहे. प्रतिवादी क्र १ यांनी दोन एकर शेती केशव रघुते यांना आर्थिक गरज होती म्हणून विकली. प्रतिवादी क्र. २ हे प्रतिवादी क्र. १ चा मुलगा आहे. त्याच्या प्रेमापोटी २ एकर शेती दि. १५.०१.२०१३ ला विकली. त्यातून घर बांधले. त्या विक्रीपत्रावर प्रतिवादी क्र. २ व ३ हे साक्षीदार आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. २ यांना त्यांचा हिश्शा शेतीच्या मिळकतीतून चौदा लाख रुपये मिळाले. त्यामुळे वादी हे वाटणीस पात्र नाही. वाटणी झाल्यामुळे कोणतीही मिळकत वाटणीसाठी उपलब्ध नाही.  दाव्याची आकारणी योग्य नाही. दावा हा महत्वाचे तथ्य लपवून दाखल केल्यामुळे खारीज करण्यात यावा, व नुकसान भरपाई त्यांच्यावर ५० हजार रुपये लादावी, अशी त्यांनी विनंती केली.

८. प्रतिवादी क्र. २ यांनी नि.क्र. ३१ अन्वये कैफियत दाखल केली. प्रतिवादी क्र. १ यांची स्वसंपादीत मिळकत आहे. सीटीसर्वे क्र. ३२३ सीट क्र. ७ क्षेत्र २७७.७८ स्के.मी.मौजा पाचगाव येथील, ही प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या दोन

भावांची एकत्रीत कुटुंबाची मिळकत आहे. त्यांनी दाव्यातील सर्व कथन विवक्षीतपणे नाकारले. दावा खारीज करावा, अशी त्यांनी विंनती केली.

९. माझे सन्माननीय पूर्वाधिकारी यांनी नि.क्र. ३४ अन्वये मुद्दे निश्चित केले. मी ते मुद्दे चर्चेकरीता खालीलप्रमाणे मांडण्यात येत असून, त्यावर कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जीत/एकत्रीत कुटुंबाची मिळकत आहे, असे वादी सिध्द करतात काय ?<br>Do the plaintiffs prove that suit properties are ancestral/joint family property of plaintiffs and defendants ? | **नाही** |
| **२.** | वादी यांचा वाद मिळकत मध्ये हिस्सा व अधिकार आहे? असल्यास किती ?<br>Do the plaintiffs prove that they have shares into suit property on partition? If yes, What are their shares ? | **नाही** |
| **३.** | वादी हे त्यांच्या हिस्सयाच्या विभक्त कब्जास व वाटणीस पात्र आहे काय ?<br>Do the plaintiffs prove that they are entitled to partition and separate possessoin of thier shares ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आवश्यक पक्षकारास अपसंयोजीत केले, या तत्वाची बाधा दाव्यास येते काय ?<br>Whether suit is bad for non joinder of necessary party ? | **होय** |
| ५. | प्रतिवादी क्र. २ यांच्याशी संगनमत करुन दावा दाखल केला व इतर प्रतिवादी हे शास्तीस पात्र आहे काय ? असे प्रतिवादी सिध्द करतात काय ?<br>Do the defendants prove that false suit is filed in collusion with defendant No.2 and they are entitled to compensatory ? | **नाही** |
| ६. | कोणता आदेश आणि हुकूमनामा ?<br>What order and decree ? | **अंतीम आदेशा प्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**१०.** वादी क्र. १ यांच्यातर्फे स्वतःचे शपथपत्र नि.क्र. ५७ अन्वये दाखल करण्यात आले. त्यानंतर वादी यांनी नि.क्र. ६९ अन्वये दि. ०२.०९.२०२५ रोजी पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा त्यांनी बंद केला. या व्यतिरिक्त वादी यांनी खालील दस्तांवर त्यांची भिस्त ठेवली.

| अनु क्र. | दस्तावेज विवरण | निशाणी |
|---|---|---|
| १ | गट क्र. ६१ चा सातबारा उतारा | ६१ |
| २ | आखीवपत्रीका दोन | ६२ व ६३ |

| | | |
|---|---|---|
| ३ | विक्रीपत्राची प्रमाणीत प्रत | ६४ |
| ४ | विक्रीपत्राची प्रमाणीत प्रत | ६५ |
| ५. | असेस्मेंट प्रत ग्रामपंचायत पाचगाव | ६६ व ६७ |
| ६ | फेरफार पंजी | ६८ |

**११.** प्रतिवादी यांनी, पुरावा दिला नाही. न्यायालयाने नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन त्यांचा पुरावा बंद केल्याचा दिसून येतो.

**<u>मुद्दा क्र. १ साठी</u>**

**१२.** वादी यांनी नि.क्र. ५७ अन्वये शपथपत्र दाखल केले. त्यास त्यांनी दाव्यास सुसंगत असे कथन केले. वादी यांचा उलटतपास प्रतिवादी यांनी घेतला नाही. वादी यांचा तोंडी पुरावा अबाधीत राहीला. वादी यांनी त्यांच्या तोंडी कथना व्यतिरिक्त नि.क्र. ६१ अन्वये दाखल सातबारावर त्यांची भिस्त ठेवली नि.क्र. ६१ चे अवलोकन केले असता, हा गट क्र. ६१ चा सातबारा उतारा आहे. त्यावर प्रतिवादी क्र. १ यांचे भोगवटदार म्हणून नाव आहे. नि.क्र. ६२ व ६३ अन्वये अभिलेखावर आखीव पत्रीका दाखल आहे. नि.क्र. ६२ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये शिवकुमार, कृष्णकुमार व अशोककुमार यांचे धारक म्हणून नाव आहे. नि.क्र. ६३ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये अजयकुमार जयस्वाल यांचे नाव नमुद आहे. तसेच रुपलाल हे मयत झाल्याने त्यांचे वारस हे दि.

२०.०७.२००९ रोजी घेण्यात आले. त्यानंतर ५२४/२०२२ दि. १७.०२.२०२२ अन्व्ये वाटणी पत्रान्वये नोंद घेण्यात आली. त्यावरुन शिवकुमार व कृष्णकुमार यांच्यात वाटणी झाली असे ११.०२.२०२३ च्या रकान्यात नमुद आहे. त्यानंतर दि. १७.०५.२०२३ च्या बक्षीस पत्रान्वये अजय कृष्ण कुमार जयस्वाल यांना बक्षीसपत्रान्वये मिळकत दिली असे दि. १८.०७.२०२३ च्या रकान्यात नमुद आहे.

**१३.** नि.क्र. ६४ हे विक्रीपत्राची प्रमाणीत प्रत आहे. हे नरेंद्र गावंडे यांच्याकडून निर्मला जयस्वाल व शिवकुमार जयस्वाल यांनी नोंदवून घेतल्याचे दिसते. नि.क्र. ६५ हे शिवकुमार जय्स्वाल यांनी केशव रघुते यांना गट क्र. ६१ मधील काही क्षेत्र विकले, त्याबाबतचे आहे. हेच वादी यांनी त्यांच्या शपथपत्रात नमुद केले आहे. नि.क्र. ६४ साठी वादी याच्या आईने त्यांच्या दुकानातुन पैसा दिला होता, असे कथन आहे. नि.क्र. ६५ हे आवश्यता नसल्याने त्यांनी विकली, असे वादी यांचे कथन आहे. नि.क्र. ६६ व ६७ चे अवलोकन केले असता, हे ग्रामपंचायत नमुना ८ च्या प्रती आहेत. नि.क्र. ६६ यावर घरमालकाचे नाव शिवकुमार जयस्वाल असे नमुद आहे व नि.क्र. ६७ वर जयश्री अलोक जयस्वाल व अलोक शिवकुमार जयस्वाल असे नमुद आहे. मालमत्ता क्र. ६९३ व ६९३/१ या बाबतच्या त्या मिळकती आहेत. नि.क्र.६८ चे अवलोकन केले असता ही

फेरफार नोंद वही आहे. नोंद अनु क्र. ११९३ ही शिवकुमार जयस्वाल यांनी केशव रघुते यांना विक्रीपत्र करुन दिल्याने नोंद झाल्योच दिसून येते. सदरची नोंद २०१३ मध्ये घेण्यात आली, असे दिसून येते.

**१४.** वादी यांच्यातर्फे, Bhagela Sahu and Another Vs Raju Sahu and Another, HIGH COURT OF CHATTISGARH, BILASPUR, Second Appeal No. 266 of 2010 या वर भिस्त ठेवली. त्यामध्ये मुलगा हा वडीलोपार्जीत मिळक्तमध्ये किंवा सहयातदार मिळकत मध्ये त्यांचे वडील हयात असतांना वाटणी मागु शकतो, याबाबत विवेचण केले आहे. वादी यांनी त्यांचे वडील प्रतिवादी क्र. २ यांच्याविरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**१५.** वादी यांनी मिळकत ही वडीलोपार्जीत आहे, या आशयाचे कथन केले आहे. परंतु, वादी त्याच वेळी असे कथन करीत आहे की, शिवकुमार व त्यांची पत्नी निर्मलाबाई यांनी नरेंद्र गावंडे यांच्याकडून प्लॅाट्स पाचगाव येथे खरेदी केले ओह. या बाबतचे विक्रीपत्र नि.क्र. ६४ अन्वये दाखल आहे. ते नोंदणीकृत विक्रीपत्र आहे. थोडक्यात मौजा पाचगाव येथील प्लॅाट ज्याचा मालमत्ता क्र. ६९३ आहे, तो निर्मला व शिवकुमार जयस्वाल यांनी नोंदणीकृत खरेदीने विकत घेतला आहे, हे दस्तावरुन दिसून येते. त्यामुळे ती मिळकत वडीलोपार्जीत कशी ? तसेच

सदर प्लॉट विकत घेतांना वादीच्या आईने मेडीकल दुकानातुन पैसा दिला होता, असे वादी यांचे कथन आहे. परंतु, त्याबाबत कोणतेही दस्तावेज दाखल नाही, हे फक्त वादी यांचे कथन आहे. त्यामुळे प्लॉट ही मिळकत वडीलोपार्जीत होत नाही.

**१६.** तसेच वादी यांचे कथन की, शेत मिळकतीमध्ये काही, दोन एकर शेती केशव रघुते यांना विकली आहे. त्याबाबतचे विक्रीपत्र नि.क्र. ६५ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. गट क्र. ६१ यामधील १.९७ हे.आर ही मिळकत पैकी ०.८१ आर. ही विकल्याची दिसून येते. नि.क्र. ६५ हे केशव रघुते यांच्या लाभात असल्याचे दिसून येते. जी मिळकत विकली गेली, त्याबाबत खरेदीखत व इतर कोणतीही कायदेशीर दाद मागण्यात आली नाही. केशव रघुते यांना पक्षकार म्हणून शामील केले नाही. मिळकती बाबतचे कथन संदिग्ध स्वरुपाचे आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ साठी</u>**

**१७.** मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष न्यायालयाने नकारार्थी नोंदविला आहे. मिळकत ही वडीलोपार्जीत नाही. कारण वादी हे एकाचवेळी वडीलोपार्जीत आहे असे कथन करीत आहे, त्याचवेळी त्यांनी मिळकत घेण्यास पैसे दिले, हे देखील कथन करीत आहे. काही मिळकत विकली गेली, हे देखील दस्तावरुन दिसून येते. त्यामुळे निश्चीत मिळकतीचा बोध होत नाही. सबब, मी मुद्दा क्र. २ व ३ चा निष्कर्ष

नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ साठी</u>**

**१८.** वादी यांनी अभिलेखावर नि.क्र. ४७ अन्वये अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. ५ व ६ यांना सामील केले. यानंतर वादी यांनीच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांना नि.क्र. ५५ अन्वये अर्ज दाखल करुन वगळण्याची विनंती केली.त्यामुळे त्यांना वगळण्यात आले. त्यास वगळण्याचे कारण म्हणजे दि. १७.०२.२०२२ रोजी दस्त क्र. ५२४/२०२२ अन्वये आपसी वाटणीपत्र करण्यात आले आणि त्या वाटणीअन्वये प्रतिवादी क्र १ ला ११५/९४ मिळक्त देण्यात आली, असे त्यांनी नि.क्र. ५५ च्या अर्जात नमुद केले आहे. थोडक्यात पक्षकार हे शामील केले व नंतर त्यांच्यात वाटणी झाली व त्यांना वगळण्यात आले.

**१९.** परंतु, केशव रघुते यांना दाव्यात सामील केले नाही. नि.क्र. ६५ विक्रीपत्र हे त्यांच्या संबंधीत आहे. सबब, मी मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ साठी</u>**

**२०.** प्रतिवादी यांनी पुरावा दाखल केला नाही. इतकेच काय त्यांनी उलटतपास देखील घेतला नाही. प्रतिवादी यांनी सुरवातीला दोन स्वतंत्र विधीज्ञांतर्फे लेखी बयान दाखल केले होते. नंतर नि.क्र. ५८ तर्फे त्यांनी एकाच

विधीज्ञांचे वकीलपत्र अभिलेखावर दाखल केले. अभिलेखावर प्रतिवादी यांचा कोणताही पुरावा नाही. त्यांनी का दाखल केला नाही? याचे कारण तेच जाणु शकतात. त्यामुळे प्रतिवादी यांनी, प्रतिवादी क्र. २ यांचे काही संगनमत होते, याबाबत कोणताही पुरावा दिला नाही. त्यामुळे ते खर्चास किंवा शास्तीस पात्र नाही. सबब, मुद्दा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ साठी</u>**

**२१.** प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च,२०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

**२२.** वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक आहेत. त्यामुळे उभय पक्षकारांनी दाव्याचा खर्च स्वतः सहन करावा असेच सांगणे न्यायोचित आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र. ६ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

- दावा हा खारीज करण्यात येतो.
- उभय पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.
- येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.
- न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.

RAJU BHASKAR DOLE
Judgment
Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.04.02 13:52:46 +0530

**उमरेड .** **(रा.भा. डोळे)**

**दिनांक : ०१.०४.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**उमरेड**

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर.ए.देशकर

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड .

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – ०१.०४.२०२६

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३